Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १२५ • Title - Code :- MAHMAR49513 • शुक्रवार दि.२ फेब्रुवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.


## अर्थमंत्र्यांची मोठी घोषणा

# १ कोटी घरांना प्रतिमहिना ३०० यूनिट मोफत वीज देणार



दिल्ली :- केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन या लोकसभा निवडणुकांपूर्वी सरकारचं अंतरिम बजेट सादर करत असून या बजेटदरम्यान त्यांनी मोफत वीज देण्याबाबत मोठी घोषणा केली आहे.रूफटॉप सोलर पॅनलच्या माध्यमातून सरकारकडून १ कोटी घरांना दरमहिन्याला ३०० यूनिट मोफत वीज दिली जाईल, अशी माहिती निर्मला सीतारामन यांनी केली आहे. त्यामुळे महागाईने त्रस्त झालेल्या सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.सरकारकडून मत्स योजनेसह मोहरी आणि भुईमुगाच्या शेतीला प्रोत्साहन दिलं जाईल. तसंच कृषी क्षेत्रासाठी मॉडर्न स्टोरेज आणि सप्लाई चेनवर सरकार लक्ष केंद्रीत करणार आहे. छोट्या शहरांना जोडण्यासाठी ५१७ नव्या मार्गांवर उडान योजनेच्या अंतर्गत काम होणार आहे. सर्वांसाठी घर, पाणी आणि वीज यावर आमचा भर आहे, असा दावाही निर्मला सीतारामन यांनी अंतरिम बजेट सादर करताना केला आहे.दरम्यान, मागील १० वर्षांत २५ कोटी लोग गरिबी रेषेच्या वर आले. ८० कोटी लोकांना मोफत राशन देण्याची व्यवस्था करण्यात आली. तसंच शेतमालाची किमान आधारभूत किंमत आमच्या सरकारने वाढवली, अशी माहितीही अर्थमंत्री सीतारामन यांनी दिली आहे.

## महिला व बालविकास विभागातर्फे संवाद योजना

**चंद्रपूर**–काळजी आणि संरक्षणाची गरज असणारी बालके बालगृहामध्ये राहत असतात. या बालकांना वन स्टॉप सेंटर आणि स्त्री आधार केंद्र येथील महिलांना आधार मिळावा आणि बालक व महिलांशी संवाद साधून प्रत्यक्ष वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी महिला व बालविकास आयुक्त यांच्या संकल्पनेतून जिल्हा महिला व बालविकास अधिकारी दीपक बानाईत यांच्या मार्गदर्शनात संवाद योजना राबविण्यात येत आहे.याअंतर्गत बालकांचा शारीरिक, मानसिक विकास व्हावा हा योजनेचा उद्देश आहे. या उपक्रमांतर्गत जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयातील प्रत्येक कर्मचारी महिन्यातून एक दिवस बालगृहात निवासी थांबणार आहे. महिला कर्मचारी मुलींचे बालगृह, स्त्री आधार केंद्र तर पुरुष कर्मचारी मुलांचे बालगृह येथे निवासी राहतील. येथील महिला व बालकांची हितगुज करत महिला व बालक राहत असलेल्या संस्थेतील राहण्याची व्यवस्था, जेवण, स्वच्छता, आरोग्य विषयक काळजी आणि सोयी सुविधा व त्यांना येणाऱ्या अडचणी जाणून त्यावर उपाययोजना करणार आहेत.बालगृहात राहणाऱ्या बालकांचे शारीरिक आणि मानसिक विकासाबाबत सर्व कर्मचाऱ्यांना जबाबदारी घ्यायची आहे. सदर उपक्रमामध्ये जिल्ह्यातील जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, चाइल्ड लाईन, वनस्टॉप सेंटर आदी कर्मचारी सहभागी होणार आहेत. असे जिल्हा महिला व बालविकास अधिकारी दीपक बानाईत यांनी कळविले आहे.

## संभाजीनगरात गॅस गळतीचा थरार



**छ. संभाजीनगर**–छत्रपती संभाजीनगरमध्ये गुरुवारी पहाटे गॅसचा टँकर सिडको उड्डाणपुलाच्या कठड्याला धडकला. या टँकरमध्ये जवळपास १८ मेट्रिक टन गॅस होता. त्याची वेगाने गळती होत असल्यामुळे या भागात आपत्कालीन स्थिती लागू करण्यात आली आहे. आतापर्यंत या टँकरमधील वायूरुपी गॅस गुरुत्वाकर्षणाच्या मदतीने दुसऱ्या टँकरमध्ये भरण्यात आला आहे. पण द्रवरुप गॅस अद्याप भरण्याचे काम सुरू आहे. हे एक अवघड आव्हान असल्याचे सांगितले जात आहे. या दुर्घटनेची माहिती मिळताच पुण्याहून एनडीआरएफचे एक पथक तातडीने संभाजीनगरमध्ये दाखल झाले आहे. आता अपघातग्रस्त टँकर शहरी भागातून बाहेर हलवण्याचेही प्रयत्न केले जात आहे. पण याचा निर्णय सखोल विचाराअंतीच घेतला जाणार आहे. टँकरचे दोन व्हॉल्व्ह लिकेज झाले असून त्यातून गॅसगळती सुरू होत आहे. जळगावची एमर्जन्सी रेस्क्यू टीमही घटनास्थळी काम करत आहे.मनपा आयुक्त जी श्रीकांत यांनी दिलेल्या माहितीनुसार, वायू गळती थांबवण्यासाठी प्रयत्न करणे सुरू आहे. सातत्याने टँकरवर पाणी मारणे सुरू आहे. जळगावची एमर्जन्सी रेस्क्यू टीम दाखल झाली असून गॅस लिकेज थांबवण्याचा प्रयत्न केला जात आहे. गॅस लिकेज होत आहे परंतु टँकरमध्ये गॅस पूर्णपणे भरलेला दिसत आहे. यावर उपाय म्हणून हा गॅस दुसऱ्या टँकरमध्ये भरण्याची व्यवस्थाही करण्यात आली आहे. जर अशाच प्रकारे प्रोसेस सुरू राहिली तर जवळपास तीस तास लागण्याची शक्यता आयुक्तांनी वर्तवली आहे.

## औद्योगिक आस्थापनांनी सुरक्षेची काळजी घ्यावी–जिल्हाधिकारी विनय गौडा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**




जिल्ह्यात एकुण १९३ औद्योगिक कारखाने आहेत. या कारखान्यात अतिधोकादायक ते सर्वसाधारण रसायने वापरली जातात. यापासून कोणतीही जिवितहानी किंवा अपघात होवू नये यासाठी नियमानुसार सुरक्षिततेविषयक उपाययोजनांची अमंलबजावणी करुन औद्योगिक आस्थापनांनी सुरक्षेची काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी केले. औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत, अरिष्ट समूहाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

बैठकीला औद्योगिक सुरक्षा व आरोग्य उपसंचालक शरद धनविजय, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे, प्रादेशिक परिवहन अधिकारी किरण मोरे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी जितेंद्र सुरवाडे तसेच जिल्ह्यातील विविध उद्योगांचे प्रतिनिधी उपस्थित होते.जिल्ह्यात विविध औद्योगिक कारखाने आहे. या कारखान्यांमध्ये कोणकोणती धोकादायक रसायने वापरली जातात यांच्या माहितीसह रसायनांची यादी तयार करावी. उद्योगांनी त्यांच्याकडे असलेल्या सुरक्षा साहित्यांची माहिती घ्यावी. मनुष्यहानी व इतर हानी टाळण्यासाठी उद्योगांनी सुरक्षाविषयक साहित्याचा आढावा घ्यावा व सुरक्षा नियमावलीचे पालन करावे. कारखान्यामध्ये अपघात होता कामा नये याबाबत दक्षता घ्यावी व नियमित पाठपुरावा करावा.आपात्कालीन परिस्थितीत नियोजनासाठी संबंधित यंत्रणाची संपर्कप्रणाली अद्यायावत ठेवावी. तसेच अग्निरोधक व्यवस्था, सुरक्षेसाठी वापरले जाणारे कालबाह्य साहित्य मुदतीपुर्वी बदलवुन घेण्याच्या सुचना जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी दिल्या.

## पत्रकारांची लोकशाही मधील भूमिका महत्वाची–रवींद्र तिराणिक

**वर्धा । प्रतिनिधी**



पत्रकार लोकशाही मधील खरा आरसा असून पत्रकारांनी निर्भीड व निरपेक्ष व पारदर्शकपणे लिखाण करावे .कुठल्याही राजकीय पक्षांचे धार्जेने व मांडलिकत्व म्हणून काम करू नये तरच पत्रकारांचे व्यक्तिमत्त्व लोकशाहीमध्ये येणाऱ्या काळात अभाधित राहील. असे स्पष्ट मनोगत सामाजिक चळवळीतील कार्यकर्ते जनमंच सदस्य नागपूर तथा अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे महाराष्ट्र प्रदेश संपर्कप्रमुख रवींद्र तिराणिक यांनी केले . राष्ट्रपिता महात्मा गांधी वर्धा जिल्ह्यातील बापू कुट्टी ला भेट देत चरख्यावर बसून सूत कातीत अभिवादन करून शासकीय विश्रामगृह येथे आयोजित वर्धा जिल्हा पत्रकारांच्या विशेष संघटनात्मक बांधणीच्या नियोजित बैठकीत उपस्थित राहून ते बोलत होते.

सध्याच्या परिस्थितीत लोकहित- जनहित प्रश्नांना बगल देत काही स्तरावर राजकीय मंडळीचे घरगडी चाकरी करणाऱ्या पत्रकारांची संख्या झपाट्याने वाढताना दिसत आहे. हे लोकशाहीच्या दृष्टीने घातक प्रवृत्तीचे लक्षण आहे. पत्रकारांनी आपली अस्मिता अस्तित्व स्वाभिमान कुणाकडेही गहाण न ठेवता आपले व्यक्तिमत्व लोकशाहीमध्ये उजळ कसे राहील यादृष्टीने वाटचाल करण्याची खऱ्या अर्थाने गरज आहे. शोषित पीडित यांच्या वेदना समस्या शासन स्तरावर पोहोचवण्यासाठी कोणत्याही राजकीय सामाजिक संघटना चळवळ यांचे मुखपत्र असणे आवश्यक आहे परंतु त्यात सामाजिक दायित्व हा भाग महत्त्वाचा आहे .असे मनोगत अध्यक्षीय बैठकी प्रसंगी केले. नियोजित बैठकीत कार्याविस्तार कार्यक्रम स्वरूप व रूपरेषा संघाचे सदस्यत्वतः जिल्ह्यातील विविध तालुका कार्यकारणी गठन या संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले . प्रास्ताविक मार्गदर्शन जिल्हाध्यक्ष प्रदीप नागपूरकर, संचालन जिल्हा कार्याध्यक्ष भास्कर कोसुरकर यांनी केले. प्रसंगी सचिन महाजन, शेख मनवर शेख, महेंद्र लोखंडे, प्रमोद जुमडे, फैमोद्दीन शे. अनुदिन, आकाश जाधव, वा .शेंडे, समीर आसुटकर जिल्ह्यातील कार्यकारणीतील पत्रकार व सामाजिक पदाधिकाऱ्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. आभार सचिन महाजन यांनी केले.

## विरूर स्टे.येथे विदर्भ स्तरीय खंजिरी भजन स्पर्धेचे उद्घाटन




**राजुरा । प्रतिनिधी**

आदर्श श्रीगुरुदेव सेवा भजन मंडळ विरूर (स्टेशन) आणि समस्त ग्रामवासीय जनतेच्या सहकार्यांने वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने विदर्भस्तरीय खंजिरी भजन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. बाजार चौकात झालेल्या या भजन स्पर्धेचे उदघाटन ज्येष्ठ साहित्यिक ग्रामगीताचार्य बंडोपंत बोढेकर यांचे हस्ते झाले.अध्यक्षस्थानी पो.स्टे.विरूरचे ठाणेदार जयप्रकाश निर्मल होते .केंद्रीय प्रचार समिती सदस्य ड.राजेंद्र जेनेकर, सुप्रसिद्ध समाजसेवक तथा माजी सैनिक मनोज ठेंगणे,तालुका उपसेवाधिकारी लटारू मत्ते, सरपंच अनिल आलाम, उपसरपंच सौ. प्रीतीताई पवार,सुभाष पावडे,माजी जि. प. सदस्य अविनाश जाधव, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रभाकर ढवस, सरिता अजय रेड्डी, सुरेश पावडे, भीमराव पाला,अजय रेड्डी, भास्कर सिडाम,मनोज सारडा,तिरुपती नल्लाल्ला ,सचिन उलमाले, मुअ वडगावकर, मुअ रामचंद्र पाला,आबाजी ढुमणे,डा.उमप,रुंदा पेंदोर,सुनिल गोरे,संजय उमरे,सुनिता इग्रपवार,बळीराम बोबडे,दादाजी झाडे,बोबाटे सर,शैलेश कावळे, मनोहर बोबडे,गजेंद्र ढवस आदींची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी ग्रामगीताचार्य बोढेकर म्हणाले,राष्ट्रसंतांची भजने म्हणजे नित्यनूतन स्फूर्तीचा झरा असून ती समाजाला सदैव मार्गदर्शन करीत असतात.खंजिरी भजन स्पर्धेच्या माध्यमातून लोकशिक्षण आणि ग्राम संस्कृती जतन करण्याचे महान कार्य होत असल्याचे ते म्हणाले. ठाणेदार निर्मल यांनी मंडळाच्या आजवरच्या कार्याचे कौतुक करून मंडळानी युवा वर्गांना तंबाखू दारू या सारख्या व्यसनांपासून दूर करण्याचे कार्य हाती घ्यावे,असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले.ड.राजेंद्र जेनेकर यांनी तालुक्यातील गुरुदेव सेवा मंडळाच्या प्रचार प्रसार कार्यासंबंधी विचार व्यक्त करून राष्ट्रसंत साहित्याचा प्रचार गावोगावी मोठ्या प्रमाणात व्हावा असे मत व्यक्त केले. तर समाजसेवी मनोज ठेंगणे यांनी युवकांना बलवान,आरोग्यवान होण्याचे आवाहन करून ग्रामविकासासाठी शेतीपूरक व्यवसायावर जोर देण्याविषयी मत नोंदविले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंडळाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर मोरे यांनी केले,सुत्रसंचालन विनोद ठमके सचिव व आभारप्रदर्शन राकेश कडूकर यांनी केले तर मंडळाचे देविदास खोबरे,प्रवीण चिडे, मंगेश पावडे, उमेश मोरे, प्रीतम राऊत,वामन ठमके,भूषण कडूकर,संगेश पावडे, विलास आक्केवार, नामदेव चिडे, दिनेश आत्राम आदी सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.

## प्रजासत्ताक दिनानिमित्त श्रीराम फायनान्स येथे रक्तदान शिबिर संपन्न

**राजुरा । प्रतिनिधी**



श्रीराम फायनान्स लिमिटेड शाखा राजुरा येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त रक्तदान शिबीरचे आयोजन करण्यात आले. रक्तदान शिबीरचे उद्घाटन युनिव्हर्सल पिस फाउंडेशनचे सचिव शारिक शेखच्या हस्ते करण्यात आले.

रक्ताचा तुटवडा नेहमीच असतो जो पर्यंत कुणाच्या नातेवाईकाला रक्ताची गरज भासत नाही तो पर्यंत त्यांना रक्ताची गरज कळत नाही. जास्तीत जास्त रक्तदात्यांनी रक्तदान करावे हे आव्हान शारिक शेख यांनी या दरम्यान केले.श्रीराम फायनान्स लिमिटेड शाखा राजुराचे प्रबंधक राहुल साव तसेच गोल्ड लोनचे प्रबंधक जय रामटेके, टूवीलरचे प्रबंधक गणेश कोलते, अतुल नवघरे, नितीन चौधरी, सचिन टोंगे, सुनील रामटेके , श्रावण, दीपक मेघरवार, राहुल वाटगुरे, कबीर घोनमडे, निखिल कोहपरे, चंदु मांडवकर, विशाल सूर्तिकर, अमन शर्मा यांनी सुद्धा रक्तदान करून आपले मोलाचे योगदान दिले तसेच शाखे मधील सर्व कर्मचाऱ्यांनी रक्तदान शिबीर मध्ये आपले मोलाचे योगदान दिले. या शिबीरमध्ये शाखेच्या व्यतिरिक्त अर्जुन चौधरी, अमोल नेवारे, अमित उरवते, रामबाबु नाईक, शारीक शेख, रमेश कोयलवार, साजिद खान, नरेश रासकोंडा, सोहेल खान पठाण, साबिक शेख, या सर्वांनी रक्तदान करून आपले मोलाचे योगदान दिले. त्यानंतर नागपूर येथील साईनाथ ब्लड बँक यांनी ब्लड कलेक्शन करून सहकार्य केले.

## ब्राईट कॉन्व्हेंट येथे वार्षिक स्नेहसंम्मेलन उत्साहात साजरे

**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

येथील ब्राईट कॉन्व्हेंट येते बुधवारी(दि.३१) वार्षिक स्नेहसंम्मेलन पार पडले.या कार्यक्रमाचे निमित्य साधत शाळकरी मुलांच्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण करण्यात आले.कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थापक देवराव सरवर यांनी केले.अध्यक्षस्थानी शिवसेना तालुकाप्रमुख सुरज माडूरवार,तर प्रमुख अतिथी म्हणून बाजार समितीचे संचालक समीर निमगडे,केंद्रप्रमुख रोहनकर,धिरज बक्षी,निर्जरा बक्षी,बांगरे,प्राचार्य अनुराधा सरवर आदिंची उपस्थिती होती.बौद्धिक विकासासह सांस्कृतिक विकास देखिल गरजेचा आहे.तेव्हा शाळकरी मुलांच्या सर्वांगिण विकासात

सांकृतीक कार्यक्रमाची गरज आहे.शिक्षणामुळे माणसाच्या प्रगतीला चालना मिळते व विद्यार्थी उज्वल भारताचे भविष्य असल्याचे मत यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले.यावेळी विद्यार्थी व पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# मोबाईल साक्षरता

**विज्ञानाच्या प्रगतीने अनेक ऐश्वर्य आपल्या पायाशी लोळण घालत असली तरी गाफील व बेसावध राहिल्यास ती मनस्तापाची कारणेसुद्धा ठरू शकतात. मोबाईल हा त्यातलाच एक प्रकार. मोबाईल हाताळताना सावधानपणे हाताळला पाहिजे. सतर्कता, सावधानता हीच आपली सुरक्षितता.**




डॉ.यशवंत घुमे
मो.९८२२२३३९१२
sahyandrinews@gmail.com



अलिकडे भौतिक सुखसुविधा मोठ्या प्रमाणावर लाभल्या आहेत. तशाच त्यापासून अनेक प्रकारच्या गैरसोयीसुद्धा निर्माण होऊ लागलेल्या आहेत. माणूस जितका सुखाच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करतो. अनेक भौतिक गोष्टी प्राप्त करण्याचा प्रयत्न करतो. त्यातून त्याला विशेष आनंद तर मिळतोच परंतु समाधान मिळेलच याची खात्री नाही. कधीकधी अप्रूप म्हणून वापरलेल्या या भौतिक सुविधा मनाला अनेकदा मनस्ताप देत असतात. मागील दशकापासून चलभाष, भ्रमणध्वनी,म्हणजेच मोबाईलने घराघरांत प्रवेश केलेला आहे. कधीकाळी श्रीमंत व राजकीय लोकांच्या हातात दिसणारे हे अप्रूप आता सर्वसामान्य लोकांच्या बेडरूमपर्यंत पोहोचल आहे. परवाच एक बातमी वाचनात आली की अलीकडे हा मोबाईल कुटुंबातील लोकांमध्ये मतभेद,कलह निर्माण करण्याचे काम सुद्धा करत आहे. अनेक कुटुंबांत होणाऱ्या कलहात या मोबाईलचा महत्त्वाची भूमिका असल्याची ती बातमी होती. नवरा बायकोमध्ये भांडणे लावण्याचे काम हाच मोबाईल करतो. कौटुंबिक कलहात याचाच महत्त्वाचा वाटा असतो. अलीकडील वाढत्या घटस्फोटामध्ये मोबाईलची अहमान्य भूमिका आहे. गमतीने सांगायचे तर एखाद्यावेळी श्वास थांबवता येईल परंतु मोबाईल शिवाय जगता येणे शक्य नाही.कधीकाळी प्रतिष्ठेची वस्तू समजला जाणारा हा मोबाईल आज घरातील प्रत्येक व्यक्तीच्या हातात जीवनावश्यक गरज बनला आहे. लोकसंख्येच्या बाबतीत जगात नंबर वन समजल्या जाणाऱ्या चीनच्या लोकसंख्येलाही मागे टाकेल एवढे मोबाईलचे प्रमाण आपल्याकडे वाढले आहे. अक्षरशः घरामध्ये वडिलांजवळ एक, आईजवळ दुसरा, मुलाजवळ तिसरा, मुलीजवळ चवथा आजोबांजवळ पाचवा .पाच दहा मोबाईल संख्या वाढली आहे.अनेक मोबाईल एकाच घरात गुण्यागोविंदाने वास्तव्यास राहतात. इतके मोबाईलचे स्तोम आपल्याकडे शहरी ग्रामीण भागापर्यंत पोहचलेले आहे. आता मोबाईल ही चैनीची वस्तू राहिली नाही ती आता प्रत्येकाची जीवनावश्यक गरज झालेली आहे. जगण्याची अनिवार्यता मोबाईलमध्ये आलेली आहे. एखाद्या वेळेस जेवायला जेवण मिळाले नाही तरी चालेल पण जवळ मोबाईल असलाच पाहिजे. या मोबाईल वरती अनेक प्रकारचे किस्से आपण वाचत असतो. ऐकत असतो आणि बोलतही असतो. सांगायचे तात्पर्य म्हणजे मोबाईल हा प्रत्येकाच्या जीवनातील आवश्यक भाग बनला आहे. कमी किमतीत भरपूर मिळणारा डेटा याला कारणीभूत आहे. शेकडो प्रकारचे काम हा मोबाईल करत असल्याने जणू काही तो आता मानवजातीचा श्वास झाला आहे. जसा तो नागरिकांचा श्वास झाला तशी त्याचे काही गैरफायदेही पुढे येत आहे. परवा माझे प्राध्यापक मित्र भेटले. त्यांनी किस्सा सांगितला तो फारच सतर्क राहायला लावणारा आहे. तो आज या लेखाच्या निमित्ताने मला सांगावसं वाटतो. तो किस्सा असा की आमच्या एका प्राध्यापक मित्राची मुलगी बाहेरगावी कुठेतरी शिक्षण घेत असते. त्या मुलीला कुणीतरी अज्ञात इसमाने फोन करून सांगितले की मला तुझ्या वडिलांनी तुझ्या मोबाईलवर १५ हजार रुपये टाकायला सांगितले होते. पहिल्या वेळेस मी १० हजार रुपये तुझ्या मोबाईलमध्ये टाकलेले आहे. आणि दुसऱ्या वेळेस ५ हजार रुपये टाकायचे होते. चुकीने त्या ५ हजार समोर चुकून एक शून्य वाढल्यामुळे पाच हजार रुपयांच्या ऐवजी ५० हजार रुपये तुझ्या खात्यात जास्त आलेले आहेत. कृपया तू त्यातील जास्त आलेले ४५ हजार रुपये मला परत कर. मी दवाखान्यात भरती आहे. मला पैशांची अत्यंत आवश्यकता आहे. शक्य तितक्या लवकर आजच्या आज पैसे परत पाठवावे असा आग्रह धरू लागला. मुलगी कामात व्यस्त होती.संबंधिताने आपल्या बोलण्यात तिच्या वडिलांच्या नावाचा उल्लेख केल्यामुळे तिला ही व्यक्ती आपल्या वडिलांच्या ओळखीची असावी आणि वडिलांचे पैसे त्यांनी आपल्या नावावर टाकले असावेत असा समज झाला. मुलीने तिच्या खात्यातील पैसे आलेल्या मोबाईल नंबरवर संबंधिताला परत करण्याचा प्रयत्न केला. परंतु दुर्दैवाने मोबाईल ऑपरेट करताना तिच्या हातून काहीतरी तांत्रिक चुका झाल्या. परिणामतः ती रक्कम पुढे जाऊ शकली नाही. तिने ही अडचण फोन करून आपल्या वडिलांना सांगितली. तुमच्या मित्राचा मला फोन आला होता. त्यांनी चुकून माझ्या खात्यामध्ये ४५ हजार रुपये जास्त टाकले आहे जे त्यांना परत करायचे आहे. परंतु माझ्याकडून ते जाऊन राहिले नाही तर मी काय करू? वडिलांच्या कानावरती सगळा किस्सा येताच त्यांनी मुलीला कुठल्या प्रकारचे पैसे पाठवू नको. तुझी फसगत होत आहे असे स्पष्ट सांगितले. आणि होणारा अनर्थ टळला हा प्रसंग आज प्राध्यापक मित्राच्या कुटुंबावर आलेला असला तरी तो नेहमी अनेकांच्या आयुष्यात येत असेल. परंतु या कानाची खबर त्या कानाला लागत नाही. त्यामुळे सहसा आपल्याला अशा घटना माहितीच पडत नाहीत. म्हणून लेखाच्या सुरुवातीला मी जो उल्लेख केला की मोबाईल ही आता चैनीची वस्तू राहिली नाही. मोबाईल जितका फायद्याचा आहे तितकाच तो गैरसोयीचा सुद्धा आहे हे लक्षात घेतले पाहिजे. त्यापासून कधी केव्हा कोणते नुकसान होईल हे सांगताच येत नाही. मोबाईलचे गैरफायदे सांगणे हा माझा आज मुळीच हेतू नाही. फक्त मोबाईल हाताळताना त्याचा वापर करताना आपण सतर्क असले पाहिजे हेच या निमित्ताने मला सांगायचे होते. मोबाईल हाताळताना अतिशय चौकसपणे हाताळला पाहिजे. येणारे कॉल काळजीपूर्वक ऐकले पाहिजेत .सतर्कता, सावधानता जर बाळगली तर कदाचित होणाऱ्या संभाषण नुकसानाला टाळता येईल. जरा का गाफील राहिलो तर नुकसान झाल्याशिवाय राहणार नाही. मोबाईलचे अनेक तोटे असले तरी ते आज मला बोलायचेच नाही. फक्त मोबाईलच्या माध्यमातून होणारी फसवणूक विशेषतः आर्थिक फसवणूक आपण टाळली पाहिजे. बँकेचे व्यवहार करताना सहसा आपला ओटीपी किंवा आपला मोबाईल इतरांकडे हाताळायला देऊ नये. एवढे जरी केले तरी आपले जग मोठ्या प्रमाणात सुरक्षित राहील.

# जगाचा नैसर्गिक फिल्टर आणि संरक्षक!

**जागतिक पाणथळ जमीन दिवस हा एक पर्यावरणाशी संबंधित उत्सव आहे, जो १९७१चा आहे, जेव्हा अनेक पर्यावरणवादी पाणथळ प्रदेशांच्या संरक्षण आणि प्रेमाची पुष्टी करण्यासाठी एकत्र आले होते, ज्या जल परिसंस्था आहेत ज्यात वनस्पती जीवन आणि इतर जीव आहेत जे केवळ पाणीच नाही तर पर्यावरणीय आरोग्यास भरपूर प्रमाणात आणतात. शरीरे पण संपूर्ण वातावरण, जागतिक पाणथळ प्रदेश सचिव विभाग मूळचा ग्लैंड, स्वित्झर्लंडचा आहे. कॅस्पियन समुद्राच्या किनाऱ्यावरील इराणी शहर रामसर येथे रामसर अधिवेशनाचा अवलंब दि.२ फेब्रुवारी १९७१ रोजी झाला. श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी यांचा हा मार्गदर्शक संकलित लेख जरूर वाचाच-संपादक.**

इराणमधील कॅस्पियन या समुद्राच्या किनाऱ्यावरील रामसर या शहरी पाणथळ प्रदेशाचे महत्त्व या विषयावर परिषद आयोजित करण्यात आली होती. पाणथळ प्रदेशांना मानवी जीवनात असलेले स्थान सर्वांना समजावे या हेतूने दर वर्षी २ फेब्रुवारीचा दिवस वेटलँड्स डे साजरा केला जावा, असा निर्णय या परिषदेत घेतला गेला. असा पहिला दिवस १९९७ साली साजरा झाला होता. पाणथळ प्रदेश म्हणजे नदी, तलाव, सागरी किनारे अशा ठिकाणी उथळ पाण्याने झाकलेल्या व अनेकविध प्रकारच्या गवतांनी आणि झुडपांनी भरलेल्या पाणथळ जमिनी आपल्याला आढळतात. त्यामध्ये कृत्रिम तलाव व कालवे, मिठागरे, सांडपाण्याचे तलाव, मत्सशेती तलाव, शेततळी, भाताची खाचरे अशा मानवनिर्मित स्थळांचाही समावेश होतो.असा बहु उपयोगी पाणथळ प्रदेशात सद्या आपण भूगर्भातील पाण्याचा भरपूर वापर करतो. या पाण्याचे पुनर्भरण करण्याचे काम असे प्रदेश करतात. अनेकदा आपण प्रदूषित पाणी व इतर हानिकारक द्रव्ये अशा प्रदेशात फेकतो खरे; परंतु पाणथळ जागी वाढणाऱ्या वनस्पतीच या घटकांना गाळण्याचे काम करून पाणी शुद्ध करतात. उदा.कोलकात्यातून बाहेर टाकल्या जाणाऱ्या घाण पाण्याचा काही भाग शुद्ध करण्यासाठी जवळच्या पाणथळ प्रदेशाचा वापर केला जातो. भातखाचरे आणि मत्सबीज उत्पादनासाठी बनवलेली तळी हे देखील पाणथळ प्रदेशच असल्याने त्यांमधून जगभरातील ३ अब्ज लोकांना दररोजचे अन्न- भात आणि मासे मिळते. सागरी किनारपट्टीवर असलेल्या अशा गवतयुक्त पाणथळ प्रदेशांमुळे लाटांनी होणारी किनाऱ्यांची धूप थांबवली जाऊन वादळांपासून होणारे नुकसानही घटते. शिवाय समुद्राचे आक्रमण थोपवून किनारी जमीन अतिक्षारयुक्त- निरुपयोगी खारपड होण्याची क्रियाही तेथील मॅनग्रुव- खारफुटी प्रकारच्या झुडपांमुळे कमी होते. नदीला पूर आल्यास किंवा अतिवृष्टी झाल्यासही हे जास्तीचे पाणी किनारी पाणथळ प्रदेशात मुरते व मानवी वस्ती जलमय होण्याच्या संभाव्य धोक्याचे प्रमाण कमी होते. महाराष्ट्राचा विचार केल्यास असे दिसते, की इथले महत्त्वाचे पाणथळ प्रदेश हे दख्खनच्या पठारावरील नद्या- उपनद्या, धरणांमागील जलाशय आणि पाझर तलावांच्या आसपासच्या परिसंस्था आहेत. यामुळे भूजलाचे पुनर्भरण आणि पाझर यात मोलाची मदत होते. पक्षी आणि पाणथळ प्रदेशात बगळे, बदके, करकोचे, खंड्या तसेच शिकारी प्रजातींच्या व इतरही अनेक पक्ष्यांना पाणथळ प्रदेशांतूनच अधिवास मिळतो. प्लवर सारख्या विशिष्ट प्रजातींची घरटी पाणथळ प्रदेशांत आढळतात. करकोचे, शराटी- इबिस, चमचा, रोहित- फ्लेमिंगो हे पक्षीही पाणथळ जागीच येतात. अगदी सायबेरियासारख्या प्रदेशांतूनही क्रेन आणि बदके इथे येतात. कारण इथे त्यांना अन्न मिळते. हे पक्षी या प्रदेशातील अन्नसाखळीतला एक महत्त्वाचा दुवा असतात. आपण काय करू शकतो. दुर्दैवाने आज पाणथळ प्रदेशांकडे वाया गेलेली जमीन म्हणूनच पाहिले जाते, पण जैविक आणि पर्यावरणीय साखळीतील त्यांचे महत्त्वाचे स्थान लक्षात घेऊन ते जतन करून, तिथला कचरा इ.दूर करून त्यांचा सजगतेने वापर करणे गरजेचे आहे. प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखून वैयक्तिक पातळीवर सुद्धा पाणथळ प्रदेश वाचविण्याचा प्रयत्न केला तरी या दिशेने एक ठोस पाऊल उचलले जाऊ शकते. आपल्या प्रत्येकाच्या खारीच्या वाट्याने पृथ्वीवरची ही महत्त्वाची समस्या काही प्रमाणात कमी होऊ शकते आणि पर्यावरणाची बूज राखली जाऊ शकते.जागतिक पाणथळ भूमी दिवस दरवर्षी फेब्रुवारीच्या दुसऱ्या दिवशी साजरा केला जातो, जरी तो १९९७पर्यंत साजरा केला जात नव्हता. हा दिवस जगभरातील पाणथळ प्रदेशांचा प्रभाव आणि सकारात्मक उत्पादन अधोरेखित करतो आणि समुदायांना फायद्यासाठी एकत्र आणतो. हा दिवस केवळ लोकांसाठीच नाही तर ग्रहासाठी पाणथळ भूभागाच्या महत्त्वपूर्ण भूमिकेबद्दल जागतिक जागरूकता वाढवतो. समुदाय रक्षक आणि पर्यावरणप्रेमी सर्वजण या दिवशी एकत्र येऊन निसर्गावरील त्यांचे प्रेम उत्सवाच्या माध्यमातून साजरे करतात, जे केवळ मानवांसाठीच नव्हे, तर जगातील सर्व प्रकारच्या जीवांसाठी पाणथळ प्रदेशांनी काय केले हे ओळखते. कालांतराने मानवी बांधकामामुळे पाणथळ प्रदेशांवर परिणाम करणाऱ्या विविध पर्यावरणीय समस्या निर्माण झाल्या आहेत. जास्त लोकसंख्या आणि बांधकामामुळे पर्यावरण संवर्धन कमी झाले आहे. अनेक पाणथळ जागा गमावल्या जात आहेत आणि पर्यावरण शास्त्रज्ञांचा असा दावा आहे की जगाचा नैसर्गिक फिल्टर आणि संरक्षक हरवण्याआधी मानवाने कोंडी ओळखली पाहिजे.सन १९९८पासून रामसर सचिवालयाने आर्थिक सहाय्यासाठी डॅनोन ग्रुप इव्हियन फंड फॉर वॉटर- पॅरिसच्या बाहेरील आणि बार्सिलोना, स्पेनमध्ये स्थापित सह भागीदारी केली आहे. रामसर सचिवालयासाठी ज्याला रामसर कन्व्हेन्शन ऑन वेटलँड्स ऑफ इंटरनॅशनल इम्पॉर्टन्स म्हणूनही ओळखले जाते, विशेषत: वॉटरफॉल हॅबिटॅट म्हणून या आर्थिक सहाय्यान डब्ल्यूडब्ल्यूडी साजरा करण्यासाठी आयोजित केलेल्या देशांच्या उपक्रमांना समर्थन देण्यासाठी लोगो, पोस्टर्स, फॅक्टशीट्स, हँडआउट्स आणि मार्गदर्शक दस्तऐवजांसह विविध पोहोच सामग्री तयार केली आहे. हे साहित्य जागतिक पाणथळ दिवस वेबसाइटवर अधिवेशनाच्या तीन भाषांमध्ये विनामूल्य डाउनलोड करण्यासाठी उपलब्ध आहे, इंग्रजी, फ्रेंच आणि स्पॅनिश भाषेत. असे म्हटल्याबरोबर सर्व साहित्य इव्हेंट आयोजकांसाठी त्यांच्या स्थानिक भाषा आणि संदर्भांमध्ये सानुकूलित करण्यासाठी आणि त्यांना अनुकूल करण्यासाठी त्यांच्या डिझाइन फाइल्समध्ये देखील उपलब्ध आहेत.सन सचिवालयाला विनंती केल्यावर काही मुद्रित प्रती देशांना उपलब्ध करून दिल्या आहेत.श्रीलंकेत जागतिक पाणथळ प्रदेश दिन साजरा झाला. सन २०१५पासून सुरू होणारी, २ फेब्रुवारीपासून सुरू होणारी महिनाभर चालणारी वेटलँड्स युथ फोटो स्पर्धा तरुणांना लक्ष्य करण्यासाठी आणि त्यांना डब्ल्यूडब्ल्यूडीमध्ये सहभागी करून घेण्यासाठी नवीन दृष्टिकोनाचा एक भाग म्हणून सादर करण्यात आली. १५ ते २४वयोगटातील लोक एखाद्या विशिष्ट पाणथळ जमिनीचे छायाचित्र घेऊ शकतात आणि ते फेब्रुवारी आणि मार्च महिन्यांदरम्यान जागतिक पाणथळ दिवस वेबसाइटवर अपलोड करू शकतात. सन १९९७पासून रामसर वेबसाइटने त्यांच्या डब्ल्यूडब्ल्यूडी क्रियाकलापांचे सुमारे १०० देशांतील अहवाल पोस्ट केले आहेत. सन २०१६मध्ये देशांना त्यांच्या क्रियाकलापांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि डब्ल्यूडब्ल्यूडी नंतर अहवाल देणे सुलभ करण्यासाठी कार्यक्रमांचा नकाशा सादर करण्यात आला. आजवरच्या जागतिक पाणथळ प्रदेश दिन थीम- दरवर्षी लक्ष केंद्रित करण्यासाठी आणि पाणथळ जमिनीच्या मूल्याविषयी जनजागृती करण्यात मदत करण्यासाठी एक थीम निवडली जाते. देश जागरूकता वाढवण्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित करतात. जसे की; व्याख्याने, परिसंवाद, निसर्ग पदयात्रा, मुलांच्या कला स्पर्धा, संपन्न शर्यती, समुदाय स्वच्छता दिवस, रेडिओ आणि दूरदर्शन मुलाखती, वर्तमानपत्रांना पत्रे, नवीन पाणथळ धोरणे, नवीन रामसर साइट्स आणि राष्ट्रीय स्तरावर नवीन कार्यक्रम समाविष्ट असतात. सन २०२३मध्ये जागतिक पाणथळ दिवसाची थीम वेटलँड्स रिस्टोरेशन अशी अपेक्षित होती आणि ती ओलसर जमिनीच्या पुनर्संचयनावर आधारित असावी, असे वाटत होते. सन २०२३- आर्द्र प्रदेश पुनर्संचयित करण्याची वेळ आली आहे, सन २०२२- लोक आणि निसर्गासाठी पाणथळ कृती, सन २०२१-

ओलसर जमीन आणि पाणी, सन २०२०- पाणथळ प्रदेश आणि जैवविविधता, सन २०१९- पाणथळ प्रदेश आणि हवामान बदल, सन २०१८- शाश्वत शहरी भविष्यासाठी पाणथळ प्रदेश, सन २०१७- आपत्ती जोखीम कमी करण्यासाठी पाणथळ जागा, सन २०१६- आमच्या भविष्यासाठी आर्द्र प्रदेश: शाश्वत उपजीविका, सन २०१५- आमच्या भविष्यासाठी वेटलँड्स, सन २०१४

पाणथळ जमीन आणि शेती: वाढीसाठी भागीदार, सन २०१३- पाणथळ जागा पाण्याची काळजी घेतात, सन २०१२- वेटलँड पर्यटन: एक उत्तम अनुभव, सन २०११- पाण्यासाठी जंगले आणि ओलसर जमीन, सन २०१२- आर्द्र प्रदेशांची काळजी घेणे- हवामान बदलाचे उत्तर, सन २००९- अपस्ट्रीम, डाउनस्ट्रीम: वेटलँड्स आपल्या सर्वांना जोडतात, सन २००८- निरोगी पाणथळ प्रदेश, निरोगी लोक, सन २००७- उद्यासाठी मासे? सन २००६-

जीविका धोक्यात, सन २००५- वेटलँड विविधतेमध्ये संपत्ती आहे- ते गमावू नका, सन २००४- पर्वतांपासून समुद्रापर्यंत- आमच्यासाठी ओलसर जमीन काम करत आहे, सन २००३- ओलसर जमीन नाही- पाणी नाही, सन २००२-

पाणथळ प्रदेश: जलजीवन आणि संस्कृती, सन २००१- एक आर्द्र जग- शोधण्यासारखे जग, सन २०००-

आमच्या संघटना आंतरराष्ट्रीय महत्त्वाचे पाणथळ प्रदेश दिन साजरे करत आहे, सन १९९९- लोक आणि पाणथळ जमीन- महत्त्वाचा दुवा, सन १९९८-

जीवनासाठी पाण्याचे महत्त्व आणि पाणीपुरवठ्यात पाणथळ जमिनीची भूमिका,सन १९९७- डब्ल्यूडब्ल्यूडी प्रथमच साजरा केला, हे विशेष!

!! विश्व पाणथळ प्रदेश दिन निमित्त सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

**संकलन व सुलेखन –**
**श्रीकृष्णदास बापू निरंकारी.**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सप- ९४२३७१४८८३.**

# ज्ञान हे वापरल्याने वृध्दींगत होते : प्रा.डॉ.अनिल भिकाने



**नागपूर–**प्रशिक्षणामुळे माणसाच्या अंगी असलेल्या कलागुणांना वाव मिळतो, आत्मविश्वास निर्माण होतो. ग्राम परिवर्तन हे स्मार्ट प्रकल्पाचा हेतू आहे आणि प्रशिक्षणाच्या माध्यमातून पशुसखींचे सबलीकरण करण्यासाठी माफसु कटिबद्ध आहे. प्रशिक्षण फक्त ज्ञान देण्यासाठी नाही तर कौशल्य विकसित करून सर्वांगीण विकास साधने साठी असल्याचे प्रतिपादन प्रा.डॉ. अनिल भिकाने, संचालक, विस्तार शिक्षण महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांनी केले. ते जागतिक बँक अर्थसहाय्यित मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट), पशुसंवर्धन विभाग व महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने शेळी व कुक्कुटपालन सुधारण्यासाठी पशुसखींचे कौशल्य वृद्धी प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत 'शेळी व परसातील कुक्कुटपालन' या विषयावर पशुसखींचे दि. १६ ते ३० जानेवारी दरम्यान आयोजित पंधरादिवसीय निवासी प्रशिक्षणाच्या सांगता कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

पशुसखींचे परिवर्तन करून सबलीकरण करण्याची जबाबदारी नागपूर पशुवैद्यक महाविद्यालय हे पार पाडत आहे आणि पुढेही महाविद्यालय अश्या प्रकाराचे प्रशिक्षण पशुसखींसाठी आयोजन करून पशुसखींना प्रशिक्षित करेल असे आश्वासन कार्यक्रमाचे अध्यक्ष सहयोगी अधिष्ठाता डॉ. सोमकुंवर यांनी केले. पशुसखी ही शासन आणि पशुपालक यांना जोडणारा दुवा आहे व त्या येणाऱ्या काळात पशुपालकांना नवसंजीवनी देतील असे मत स्मार्ट प्रकल्पाचे नोडल अधिकारी डॉ. कल्पना करगावकर यांनी मांडले. कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते प्रशिक्षण पुस्तिकेचे विमोचन तसेच प्रशिक्षणार्थ्यांना प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. या प्रशिक्षणाच्या सांगता कार्यक्रमात पशुसखींनी पारंपारिक नृत्य आणि गीत सादर करून आयोजकांचे आभार व्यक्त केले. सदर कार्यक्रमात गोंदिया आणि भंडारा या जिल्ह्यातील एकूण २५ पशुसखींनी प्रशिक्षण पूर्ण केले. प्रशिक्षण अतिशय उत्कृष्ट झाले बद्दलचा अभिप्राय लक्ष्मी मदमकर यानी दिला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहयोगी अधिष्ठाता डॉ आरजू सोमकुवर होते. या प्रसंगी व्यासपीठावर प्रकल्प समन्वयक डॉ सारीपुत लांडगे तर दृकश्राव्य माध्यमातून डॉ. राजू कोलते, सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन विभाग तसेच स्मार्ट प्रकल्प चे नोडल अधिकारी डॉ. कल्पना करगावकर, डॉ. निलेश खलाटे, तांत्रिक अधिकारी, (पशुसंवर्धन अमलबजावणी कक्ष), पुणे व अमृत इंगळे, उपव्यवस्थापक, माविम, मुंबई उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि प्रास्ताविक प्रकल्प सह समन्वयक तथा प्रशिक्षण समन्वयक डॉ. वैशाली बांठीया यांनी केले. तर प्रशिक्षण सहसन्वयक डॉ. दर्शना भैसारे यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रशिक्षण सह समन्वयक डॉ. किशोर राठोड, डॉ. शाईनी जॉय, डॉ. अतुल ढोक, डॉ. सुरेश जाधव, डॉ. शिल्पश्री शिंदे, डॉ. प्रतिभा जुमडे, डॉ. गीतांजली धुमे, प्रवीण बागड़े, तुषार मेश्राम, एम. यु. गौतम व जुवार यांनी अथक परिश्रम घेतले.

# बस सुरु करण्यासाठी शिवसेनेचे निवेदन



**पुलगाव –**पुलगाव बस डेपो आगार व्यवस्थापक यांना विजयगोपाल शिवारातील तांबा येथील गावात नागरिक आणि विद्यार्थ्यांना प्रवासाचा होत असलेला त्रास तसेच तांबा येथून चार किमी होत असलेली पायपीट संदर्भात जिल्हा प्रमुख आशिष पांडे यांच्या नेतृत्वात दहा वाजताची बस लवकरात लवकर सुरु करण्या साठी निवेदन सादर करण्यात आले.

यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे चे विधानसभा संघटक नरेश ठाकूर, तालुका प्रमुख सतीश बोरसे, तालुका संघटक संदीप कुचे, उपतालुका प्रमुख प्रवीण विलायटकर, विभाग प्रमुख राजू सीतापकर, उपतालुका प्रमुख सुधीर काकडे, माजी तालुका संघटक नितीन तुरके, माजी शहर प्रमुख प्रफुल कुंभरे, यांच्या सह राजू तिवरे, विशाल चोधरी असंख्य शिवसैनिकांनी निवेदन सादर करून दोन दिवसाच्या आत बस फेरी सुरु नाही झाली तर तिव्र आंदोलनाचा इशारा दिला.

# नागेपली येथील सेंट फ्रान्सिस इंग्लिश मिडीयम शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन

# जीवनात ध्येय ठरवून यशस्वितेसाठी वाटचाल करा : एम.रमेश

**आलापल्ली (गडचिरोली ) । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी शालेय जीवनात ठराविक ध्येय ठेवून त्याची पूर्तता करण्यासाठी वाटचाल केल्यास निश्चितच यश मिळणार असल्याचे प्रतिपादन अहेरीचे अपर पोलीस अधीक्षक एम. रमेश यांनी केले.

नागेपल्ली येथील सेंट फ्रान्सिस इंग्लिश मिडीयम कॉन्व्हेन्टचे वार्षिक स्नेहसंमेलन मंगळवारी (३० जानेवारी) पार पडले. यावेळी ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटक डॉ. लीली, प्रमुख अतिथी म्हणून अहेरीचे न्यायाधीश शाहिद, अहेरीचे उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड, गटशिक्षणाधिकारी धनंजय कांबळे, केंद्रप्रमुख जगदीश बोम्मावार, मुख्याध्यापक अर्चना, राणी दुर्गावती हायस्कूलचे मुख्याध्यापक गजानन लोनबले, गोवाडे आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना अपर पोलीस अधीक्षक एम. रमेश म्हणाले,नागेपल्ली येथील सेंट फ्रान्सिस इंग्लिश मिडीयम कॉन्व्हेन्टच्या वार्षिक स्नेसंमेलन कार्यक्रमांत येऊन मला अक्षरशः माझे शालेय जीवन आठवले असल्याचे सांगत त्यांनी इयत्ता तिसरीत शिकत असताना घडलेल्या घटनेवरून त्यांचा जीवन कसे बदलले, हा संपूर्ण किस्सा सांगितला.तामिळनाडू राज्यातील वेल्लूर जिल्ह्यात एक लहानशा गावात प्राथमिक शिक्षण घेत असताना शाळेची एकदिवसीय शैक्षणिक सहल निघाली होती. जिल्हा मुख्यालय गाठताच संपूर्ण शहरात चक्काजाम सुरू होता. काही तासांनी कळलं होतं की, वेल्लूरचे तत्कालीन जिल्हाधिकारी सत्यमूर्ती यांचे स्थानिक नेत्यांशी पटत नसल्याने त्यांची तत्काळ बदली करण्यात आली होती. मात्र, सत्यमुर्ती हे लोकहिताचे

काम करत होते. अल्पावधीतच त्यांनी सर्वसामान्यांच्या हृदयात स्थान मिळविले होते .त्यामुळे त्यांचे स्थानांतरण थांबवावे, यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने एकत्र येत चक्काजाम केला होता. कुठलेही रक्तनाते नसताना सर्वसामान्य जनता जेव्हा एखाद्या अधिकाऱ्याच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहत असेल तर त्या अधिकाऱ्यांनी कसा आदर्श निर्माण केला यावरून लक्षात आले. त्यामुळे त्याच दिवशी ठरवलं की आयुष्यात आयएएस, आयपीएस किंवा आयएफएस अधिकारी व्हायचे. तेच ध्येय समोर ठेवून वाटचाल केल्याने आज आयपीएस अधिकारी म्हणून तुमच्या क्षेत्रात काम करण्याची संधी मिळाली.त्यामुळे ध्येय निश्चित करून चांगला अभ्यास करा, असे देखील त्यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले.तर विद्यार्थ्यांना घडविण्यासाठी शिक्षकांची महत्वाची भूमिकाअसते, पालकांनी देखील आपल्या पाल्यांना आवडीनुसार क्षेत्र निवडू द्यावे, त्यांच्यावर कुठलाही दबाव आणू नका, असे आवाहन त्यांनी केले.दरम्यान मान्यवरांचे आगमन होताच विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात स्वागत केले. कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते उत्कृष्ट विद्यार्थ्यांचा शिल्ड देऊन सत्कार करण्यात आला. स्नेहसंमेलनानिमित्त विद्यार्थ्यांनी विविध नृत्य करत सर्वांना मंत्रमुग्ध केले.




## सोलहप्रहार महानाम संकीर्तन व भागवत प्रवचन कार्यक्रमाला माजी आ.दिपक आत्राम यांची उपस्थिती

**मूलचेरा । प्रतिनिधी**

तालुक्यातील श्रीनगर येथील सार्वजनिक श्री श्री राधाकृष्ण भजन मंदिर येथे आयोजित सोलहप्रहार महानाम संकीर्तन व भागवत प्रवचन कार्यक्रमाला भारत राष्ट्र समितीचे नेते,आदिवासी विद्यार्थी संघाचे विभागीय अध्यक्ष तथा माजी आमदार दिपक आत्राम यांनी उपस्थित राहून पूजन करत आशीर्वाद घेतले.



मुलचेरा तालुक्यात बंगाली बांधवांची संख्या मोठी असून येथील विविध गावात दरवर्षी मोठ्या प्रमाणात धार्मिक कार्यक्रम घेतले जातात.दरवर्षी प्रमाणे याही वर्षी श्रीनगर येथे सोलहप्रहार महानाम संकीर्तन व भागवत प्रवचन च्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमास माजी आमदार दिपक आत्राम यांनी मंदिरास भेट देऊन विधिवत पूजन करत आशीर्वाद घेतले.यावेळी मंदिर कमिटीचे अध्यक्ष सुनील सरकार,सचिव महादेव सरकार,नंदा पाल,नारायण सरकार,प्रभास मिस्त्री,मनोज मिस्त्री,हिरा मालाकार,रॉबिन मिस्त्री,निखिल सरकार,नितेश सरकार,सुरंजन मंडल, नरेश मिस्त्री,वेलगुर उपसरपंच उमेश मोहूर्ले,माजी सरपंच विजय कुसनाके,जुलेख शेख,संदीप बडगे,विनोद कावेरी,प्रवीण रेषे सह मंदिर कमिटीचे पदाधिकारी व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ.अपर्णा ढेले आचार्य पदवीने सन्मानित

**मूल । प्रतिनिधी**

महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथे संपन्न झालेल्या ३७ व्या दीक्षांत समारंभात डॉ.अपर्णा मन्मथ ढेले- कासराळे यांना कृषी विस्तार शिक्षण विभागातील संगमनेरी शेळी वरील संशोधनासाठी त्यांना आचार्य पदवी प्रदान करण्यात आली.

बँक ऑफ इंडिया शाखा बेबाळ इथे सध्या कृषी अधिकारी म्हणुन कार्यरत असलेल्या डॉ. अपर्णा मन्मथ ढेले (कासराळे) यांना अडाप्शन आफ मॅनेजमेंट प्रटीक्स अन्ड युटीलिटी परशेप्शन आफ संगमनेरी गोट रिअरर्स अँड नान डिसस्क्रिपसनगोट रिअरर्स कम्पारिटीव्ह स्टडी या प्रबंधासाठी कुलगुरू प्रशांतकुमार पाटील यांच्या हस्ते आचार्य




पदवी (पीएचडी ) देण्यात आली. मुल चे तालुका कृषी अधिकारी कासराळे यांच्या त्या सुविद्य पत्नी असुन संध्या त्या बँक ऑफ इंडिया बेंबाळ शाखेत कार्यरत आहेत.त्याच्या यशाबद्दल त्याच्या वर सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.



**तळोधी(बा) जवळील चिंधी माल येथे रोवणी करतांना स्त्रिया कामगार. छाया: प्रणय बांगरे .**

# विकसित भारताकडे नेणारा अर्थसंकल्प-डॉ.अशोक जीवतोडे

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारमण यांनी आज संसदेत २०२४-२५ चा अंतरिम अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पामध्ये देशातील विविध क्षेत्राकरीता अनेक महत्त्वाच्या घोषणा करण्यात आल्या आहेत. हा अर्थसंकल्प भारताला विकसित करणारा अर्थसंकल्प आहे, असे विदर्भवादी ओबीसी नेते डॉ. अशोक जीवतोडे म्हणाले.

या अर्थसंकल्पात शिक्षण क्षेत्राकरीता १,१२,८९८ कोटी, नवीन वैद्यकीय महाविद्यालय, मिशन इंद्रधनुष्य योजना, ७ नव्या आयआयटी व ७ नव्या आयआयएम ची स्थापना, महिलांकरीता निःशुल्क सर्व्हायकल कॅन्सर लसीकरण, १ कोटी घरांना सौर उपकरणांचे वितरण, १ कोटी गरीबांना ३०० युनिट पर्यंत मोफत वीज, लोकसंख्या नियंत्रण समिती स्थापन करणार, दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांकरीता योजना, गरिबांसाठी २ कोटी घरे, तीन कोटी महिलांना लखपती दीदी योजना, आशा वर्कर्सला आयुष्यमान योजनेचा लाभ, रेल्वे प्रवास सुखकर, ई-व्हेहिकल इकोसिस्टीम वाढविणार, कृषी क्षेत्रात पीपीपी मॉडेल आणणार, नैनो युरीया नंतर नैनो डीएपी खत वापरण्यावर भर,



आदी अनेक सुधारणा या अर्थ संकल्पात दिसत आहे.'जय अनुसंधान' हा नारा भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनण्याचे उद्दिष्ट साध्य करू शकेल असा विश्वास आहे. नारीशक्ती, अन्नदाता शेतकरी, गरीब कल्याण, विकसित भारत, सर्वांगीण विकास साधणारा सर्वसमावेशक अर्थसंकल्प तसेच महिला सक्षमीकरण, पायाभूत सुविधा मजबूत करणारा व युवकांना उद्यमशीलतेला - स्टार्टअप इनोवेशनला बळ देणारा 'रोजगारदाता' अर्थसंकल्प आहे, असेही डॉ. अशोक जीवतोडे म्हणाले.सहाव्यांदा बजेट मांडणाऱ्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे या निमित्ताने डॉ. जीवतोडे यांच्या तर्फे अभिनंदन देखील करण्यात आले आहे.

## मनसे नेत्या शर्मिला ठाकरे यांचे वरोरा आनंदवनचौक येथे जंगी स्वागत

# शेकडो मनसे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी घोषणा देत महिला सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी केले औक्षण

**वरोरा । प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या पत्नी तथा मनसे नेत्या शर्मिला ठाकरे. मनसे महिला सेना राज्य उपाध्यक्षा रिटा गुप्ता या वणी येथील पंडित प्रदीपजी मिश्रा यांच्या शिव महापुराण कथासप्ताह कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी दिनांक १ फेब्रुवारी ला वरोरा मार्गे जात असताना त्यांचे वरोरा येथील आनंदवन चौकात दुपारी ३.०० च्या दरम्यान मनसे पदाधिकारी कार्यकर्ते यांनी जंगी स्वागत केले, यावेळी मनसे महिला सेनेच्या वरोरा तालुका अध्यक्षा रेवती इंगोले व इतर महिला पदाधिकारी यांनी मनसे नेत्या शर्मिला ठाकरे व रिटा गुप्ता यांचे औक्षण करून ओवाळणी केली. दरम्यान काही काळ वाहतूक ठप्प झाली होती.



वणी येथे पंडित प्रदीपजी मिश्रा यांच्या शिव महापुराण कथा कार्यक्रमात प्रमुख उपास्थिती म्हणून शर्मिला ठाकरे यांना पाचरण करण्यात आले होते. वरोरा भद्रावती या विधानसभा क्षेत्रात मनसेची ताकत अगोदरच आहे त्यात शर्मिला ठाकरे यांची वरोरा येथे भेट म्हणजे कार्यकर्त्यांना एक प्रकारे ऊर्जा मिळाली असल्याची प्रतिक्रिया मनसे पदाधिकारी यांनी बोलून दाखवली या स्वागत कार्यक्रमाचे आयोजन मनसे जिल्हाध्यक्ष राहुल बालमवार, जिल्हा उपाध्यक्ष राजू कुकडे, जिल्हा सचिव विनोद सोनटक्के, वाहतूक सेना जिल्हाध्यक्ष उमाशंकर तिवारी, महेश वासलवार, जनहीत कक्ष जिल्हाध्यक्ष सुनील गुढे, रमेश काळबांधे, शेतकरी सेना जिल्हाध्यक्ष आंनद बावणे,मनसे महिला सेना जिल्हा उपाध्यक्षा मंदा वरखडे, महिला सेना तालुका अध्यक्षा रेवती इंगोले, भद्रावती शहर अध्यक्षा विभा बेहरे, शुभांगी मोहरे, संगीता मेश्राम, विशाल देठे, मोहित हिवरकर, प्रशान्त बदकी, गजू वादाफळे, प्रतीक मुडे. राजेंद्र धाबेकर,गजू वादाफळे, पवन ढोके, धनराज बाटबरवे, किशोर धोटे, सुनील पाझारे, प्रतीक मुडे इत्यादीनी केले आह

# शंकरपूर येथे एचपी गॅस व इंडियन गॅसची अवैद्य विक्री

## शासनाचे व गॅस कंपनीचे दुर्लक्ष

**चिमूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील शंकरपूर हे १२ हजार लोकवस्तीचे गाव असून या गावामध्ये इंडियन गॅसची अधिकृत एकच एजन्सी आहे तसेच एचपी गॅसचे संपूर्ण कनेक्शन हे चिमूर किंवा नवरगाव एजन्सी चे आहे आणि इंडियन गॅस चे लालाजी एजन्सी भिवापूर यांचे बरेचसे कनेक्शन आहेत तरीही शंकरपूर येथे यांचे गोडाऊन नसल्याने सीएससी पॉईंट म्हणजे एजंट आहेत. यांना फक्त शंभर किलो गॅस चा परवाना गॅस कंपनीकडून किंवा शासनाकडून दिलेला आहे कारण यांच्याकडे गावाच्या बाहेर गॅस साठा ठेवण्यासाठी कोणते ही गोडाऊन नाही तरीही हे सी एस सी पॉईंट धारक किंवा एजंट पैशाच्या हव्यासापोटी स्वतःच्या घरी अनाधिकृत पणे ५० सिलेंडरचा साठा ठेवत असल्याने गावामध्ये दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे काही दुर्घटना घडल्यास याला जबाबदार कोण असा प्रश्न निर्माण झाला आहे.

शंकरपूर मधील हे एजंट आपल्या घरामध्ये अतिरिक्त साठा जमा करून व ग्राहकाकडून जास्तीचे पैसे घेऊन विकत आहेत. यामध्ये ग्राहकाची मोठ्या प्रमाणात लूट केल्या जात आहे गॅस रिफील खरेदी केल्यानंतर त्याची पावती ही हे एजंट ग्राहकांना देत नाहीत त्यामुळे एवढा मोठा साठा गॅस कंपनी एजंट कडे कसे काय ठेवतात हा प्रश्न निर्माण झालेला आहे ? कोणती अघटीत घटना घडली तर यांच्याकडे कोणती उपाययोजना उपलब्ध नाही त्यामुळे त्यांना एवढा मोठा साठा घरामध्ये ठेवता येत नाही तेव्हा होणाऱ्या अघटीत घटनेस जबाबदार कोण असा प्रश्न नागरिकांमध्ये निर्माण झाला आहे. याआधी सुद्धा शंकरपूर मध्ये अशी घटना घडलेली आहे.

त्यामुळे या अवैध गॅस साठ्यावर आणि या एजंट वर एचपी कंपनीने व इंडियन कंपनीने तसेच शासनाने त्वरित कारवाई करावी अशी मागणी शंकरपूर येथील नागरिकांकडून होत आहे.

# आनंद निकेतन कृषी महाविद्यालयात नैसर्गिक/सेंद्रिय शेती प्रशिक्षण संपन्न

**आनंदवन । प्रतिनिधी**

महारोगी सेवा समिती, वरोरा द्वारा संचालित व डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला, संलग्नित आनंद निकेतन कृषी महाविद्यालय, वरोरा येथे कृषी महाविद्यालय व कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा, चंद्रपूर (आत्मा) यांच्या संयुक्त विदयमाने परंपरागत कृषि विकास योजना व डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत नैसर्गिक/सेंद्रिय शेती या विषयावर दोन दिवसीय निवासी प्रशिक्षणाचे आयोजन दिनांक ३० ते ३१ जानेवारी दरम्यान करण्यात आले होते.सदर प्रशिक्षणाचे उद्घाटन दिनांक ३० जानेवारी २०२४ रोजी झाले प्रमुख अतिथी म्हणून प्रीती हिरळकर, प्रकल्प संचालक, कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) चंद्रपूर, सुशांत लवटे, उपविभागीय कृषी अधिकारी, वरोरा उपस्थित होते , कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास पोतदार यांनी भूषविले.

या प्रशिक्षणांतर्गत शेतकऱ्यांना तज्ञ मार्गदर्शकांमार्फत नैसर्गिक/सेंद्रिय शेतीचे महत्व व व्यवस्थापन, नैसर्गिक/सेंद्रिय शेती प्रमाणीकरण, नैसर्गिक/सेंद्रिय शेतीमध्ये मित्र कीटकांची ओळख व संवर्धन, नैसर्गिक/सेंद्रिय शेतीमध्ये सेंद्रिय निविष्ठांचे महत्त्व व उत्पादन पद्धती, नैसर्गिक/सेंद्रिय शेतीमध्ये सेंद्रिय कर्ब वाढविण्याच्या उपाययोजना, सेंद्रिय खतांचा वापर, कार्यपद्धती, सेंद्रिय पद्धतीने कीड व रोग व्यवस्थापन, जैविक खतांचा वापर, नैसर्गिक सेंद्रिय शेतमाल विक्री व विपणन व्यवस्थापन, सेंद्रिय शेती उद्योजकता विकास व शेतकरी उत्पादक कंपनी, इत्यादी संबंधित मार्गदर्शन करण्यात आले. प्रशिक्षणार्थ्यांना प्रक्षेत्र भेट तसेच प्रात्यक्षिक द्वारे प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणात जिल्ह्यातील ता. भद्रावती येथील ४० शेतकरी प्रशिक्षणार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता.समारोपीय कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून कवडे, कृषि सहाय्यक ता. भद्रावती, बि.टी.एम. हिवसे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुहास पोतदार यांनी मार्गदर्शन करून प्रशिक्षणार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण केले.प्रशिक्षणाचे मुख्य समन्वयक डॉ. आर. व्ही. महाजन, समन्वयक डॉ. एस. आर. इमडे यांनी सदर प्रशिक्षणाचे आयोजन केले. सह समन्वयक डॉ. व्ही. व्ही. पाटील तथा सहाय्यक प्राध्यापक कृषी विद्या विभाग यांनी कार्यक्रमांचे संचालन केले तसेच प्रशिक्षणाच्या यशस्वीतेसाठी सर्वांनी सहकार्य केले.



# राजे अम्ब्रिशराव आत्राम यांची मन्नेराजाराम येथे पालक मेळावा तथा वार्षिक स्नेह संमेलनला उपस्थिती

**भामरागड । प्रतिनिधी**

विद्यार्थी शिक्षणा सोबत क्रीडा क्षेत्रात आपलं नाव मोठं करून आपलं भविष्य उज्वल करू शकतो. असे प्रतिपादन माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांनी मन्नेराजाराम येथील राजे धर्मराव प्राथमिक तथा माध्यमिक आश्रम शाळेत पालक मेळावा तथा वार्षिक स्नेह संमेलनाच्या कार्यक्रमात अध्यक्षीय भाषणात केले.यावेळी विद्यार्थ्यांनी लेझीम नृत्य सादर करत स्वागत केले.

पुढे बोलतांना ते म्हणाले पालकांनी मुलांना घरच्या कामात न लावता शाळेत पाठवलं पाहिजे.मुलं शाळेत येईल तेव्हाच ते आपलं भविष्य घडवेल आणि स्वतःच नाव व गावाचं नाव मोठं करू शकेल.विद्यार्थ्यांना तसेच पालकांना कोणतीही समस्या असतील तर मला भेटू शकता,मी सदैव तुमच्या समस्या सोडवण्यासाठी तत्पर आहो. आपल्या आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावं आणि त्यांची शैक्षणिक प्रगती व्हावी यासाठी स्व.श्रीमंत राजे विश्र्वेश्वरराव महाराजांनी अतीदुर्गम भागात निवासी आश्रम शाळेची स्थापना केली आहे असे मत यावेळी त्यांनी व्यक्त केले.तसेच विद्यार्थ्यांना शालेय साहित्य,गणवेश आणि क्रीडा साहित्य व बक्षीस यावेळी त्यांच्या हस्ते देण्यात आले.कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून युवा नेते अवधेशराव आत्राम, सरपंच



ग्रापंचायत मन्नेराजाराम शारदा कोरेत,उपसरपंच मनीषा मडावी,माजी जी.प.सदस्य.शारदा येगोलपवार, सामाजिक कार्यकर्ते सिताराम मडावी जिंजगाव, माजी सरपंच पोच्याजी मडावी,पोलिस पाटील कृष्णा सिडाम,बाजीराव मडावी गोरणुर,मल्लेश मडावी पो.पा.गोरनुर, तसेच २० ते २५ गावातील पालक वर्ग व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अंकीत गोयल यांची गडचिरोली परीक्षेत्राच्या पोलिस उपमहानिरीक्षकपदी नियुक्ती



**गडचिरोली । प्रतिनिधी**

गडचिरोली नक्षलविरोधी अभियानाचे गडचिरोली परीक्षेत्राचे पोलिस उपमहानिरीक्षक संदीप पाटील यांची पदोन्नतीने नागपूर येथे नक्षल विरोधी अभियानाचे विशेष पोलिस महानिरीक्षक म्हणुन पदोन्नती करण्यात आली असून त्यांच्या जागी पुणे ग्रामीणचे पोलिस अधिक्षक अंकीत गोयल यांची गडचिरोली परीक्षेत्राचे पोलिस उपमहानिरीक्षक म्हणुन नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र पोलीस अधिनियम (१९५१ चा २२) याच्या कलम २२न मधील तरतुदींनुसार ४४ भा.पो.से./ रा.पो.से. अधिकाऱ्यांची बदलीने/पदोन्नतीने पदस्थापना करण्यात येत असल्याच्या संदर्भात महाराष्ट्र राज्याच्या गृह विभागाच्यावतीने ३१ जानेवारी रोजी परीपत्रक निर्गमित केले आहे.

अंकित गोयल हे यापूर्वी गडचिरोली जिल्ह्यात पोलीस अधीक्षक म्हणून कार्यरत होते. गडचिरोली पोलीस दलात सेवा दिल्यानंतर त्यांची पुणे ग्रामीण येथे बदली करण्यात आली होती. आता गडचिरोली परीक्षेत्राचे पोलिस उपमहानिरीक्षक म्हणून त्यांची पदोन्नतीने नियुक्ती करण्यात आल्याने पुन्हा गडचिरोली जिल्ह्याशी ते कनेक्ट होणार आहेत.

# दुचाकी-ट्रॅक्टरची समोरा समोर धडक; दोघांचा मृत्यू

## एटापल्ली-गट्टा मार्गावरील महादेव मंदिर वळणावरील घटना

**गडचिरोली । प्रतिनिधी**

स्वगावाहून दुचाकीने एटापल्ली येथे कामानिमित्त येत असलेल्या पिता व लेकीचा दुचाकी-ट्रॅक्टरच्या समोरासमोर धडकेत मृत्यू झाला. ही घटना एटापल्ली-गट्टा मार्गावरील महादेव मंदिर वळणावर बुधवारी सकाळी ११ वाजता घडली.

राजू झुरू आत्राम (वय ४८) व करिश्मा झुरू आत्राम (वय २१, रा. देवपहाडी) असे अपघातात ठार झालेले वडील व लेकीचे नाव आहे. तालुका मुख्यालयापासून २० कि.मी अंतरावरील देवपहाडी येथून राजू आत्राम हे आपल्या लेकीसह मोटारसायकलने एटापल्लीला येत होते. दरम्यान, एटापल्लीवरून सिमेंट बॅग व स्टील (लोखंड) घेऊन ट्रॅक्टर एटापल्लीवरून गट्टामार्गे जात होता. दोन्ही



वाहनांची महादेव मंदिराच्या वळणावर समोरासमोर धडक झाली. यात मोटार सायकलचालक राजू आत्राम हे जागीच ठार झाले; तर मुलगी करिश्मा ही गंभीर जखमी झाली. तिला गडचिरोली येथे आणत असताना चार्मोर्शीजवळ वाटेत मृत्यू झाला.

# विवेकानंद महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिवस साजरा



**भद्रावती (प्रतिनिधी)**–स्थानिक विवेकानंद महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिनानिमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. २२ जानेवारीला प्रश्नमंजुषा, २३ जानेवारीला मतदानाचे महत्त्व या विषयावर प्रा. विजय टोंगे, प्रा. जयवंत काकडे यांचे मार्गदर्शन झाले. २४ तारखेला माननीय उपजिल्हाधिकाऱ्यांचे व्याख्यान झाले. २५ तारखेला विद्यार्थ्यांनी सामूहिक शपथ घेतली. प्राचार्य डॉ. नामदेव उमाटे यांच्या मार्गदर्शनात संपन्न झालेल्या या कार्यक्रमांच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. विजय टोंगे यांनी अथक परिश्रम घेतले. सतत चार दिवस चाललेल्या कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद होता.

# सोनापूर (बुज.)तंटामुक्ती समिती तर्फे शालेय विद्यार्थ्यांना भेट वस्तुंचे वाटप

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यातील सोनापूर (बुज.) येथील महात्मा गांधी तंटामुक्ती गाव समिती तर्फे शुक्रवारी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना नोट बुक,बालपेन आदीं वस्तूचे वाटप करण्यात आले.तर अंगणवाडीतील चिमुकल्या विद्यार्थ्यांना बास्केटचे वितरण करण्यात आले.

याकार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच शिला ठोंबरे होत्या. तर प्रमुख अतिथी म्हणून तंटामुक्त समितीचे अध्यक्ष नरेंद्र यादव लोधे,उपसरपंच महेश फटिंग,सामाजिक कार्यकर्ते तथा भाजपा बूथ अध्यक्ष शक्ती केंद्र प्रमुख अरविंद नागापुरे,तंटामुक्त समितीचे सदस्य धनाजी कावळे,नितेश खेत्रे,शंकर भरडे, अशोक कुर्झेकर,संदीप नागपुरे,गुरुदेव सेवा मंडळाचे अध्यक्ष भिमराव कुंभरे,सोनापूर व सारंगड शाळेचे सर्व शिक्षक व अंगणवाडी सेविकांची उपस्थिती होती.या कार्यक्रमात इयत्ता १ ते ४ सर्व विद्यार्थ्यांना नोटबुक व पेनचे वाटप करण्यात आले. तर अंगणवाडीच्या



विद्यार्थ्यांना ४५ बास्केटचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन मुख्याध्यापक लोखंडे यांनी केले तर आभार सहायक शिक्षिका ठाकूर यांनी मानले.या समाजोपयोगी कार्यक्रमाला संपूर्ण सोनापूर वासीय व सारंगड वासीय नागरिकांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

# जिल्हास्तरावर मुलचेराचे नावलौकिक करा-भाग्यश्री आत्राम

## तालुकास्तरीय बाल कला व क्रीडा संमेलनाचे उदघाटन

**मुलचेरा । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व क्रीडा कौशल्यांना वाव मिळावा या उदात्त हेतूने दरवर्षी बाल कला व क्रीडा संमेलनाचे आयोजन केले जाते.त्या अनुषंगाने केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धेत तालुक्यातील विद्यार्थ्यांनी चांगली कामगिरी करत तालुका स्तरावर मजल मारली आहे.आता जिल्हा स्तरावरही मुलचेराचे नावलौकिक करा असे आवाहन माजी जि प अध्यक्ष तथा सिनेट सदस्य भाग्यश्री आत्राम यांनी केले.

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा,कोपरअली येथे बुधवार (३१ जानेवारी) रोजी आयोजित मुलचेरा तालुक्याचे तालुका स्तरीय बाल कला व क्रीडा संमेलनाच्या उदघाटनप्रसंगी त्या बोलत होत्या.यावेळी या स्पर्धेचे अध्यक्ष म्हणून तहसीलदार चेतन पाटील,प्रमुख पाहुणे म्हणून गटविकास अधिकारी एल बी जुवारे, जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम सभापती युधिष्ठिर बिश्वास,पंचायत समितीचे माजी उप सभापती प्रगती बंडावार,कोठारीचे सरपंच मनोज बंडावार,तालुका कृषी अधिकारी विकास पाटील,गटशिक्षणाधिकारी नेताजी मेश्राम, केंद्रप्रमुख महेश मुक्कावार,सत्यनारायण कोमरेवार,भाऊराव निखाडे, देवनाथ बोबाटे तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.पुढे बोलताना मुलचेरा हा छोटासा तालुका असलं तरी तालुक्यात मराठी आणि बांगला असे दोन माध्यमाची शाळा आहेत.येथील विद्यार्थ्यांमध्ये अनेक सुप्तगुण दडले आहे.क्रीडा क्षेत्रात मुलचेरा तालुक्याचे विद्यार्थी नेहमीच पुढे राहिलेले आहेत.याही वेळेस उत्तम अशी चमू जिल्हा स्तरावर जाऊन यश संपादन करेल अशी आशा त्यांनी व्यक्त केली.अध्यक्षीय भाषणात तहसीलदार चेतन पाटील यांनी मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या.दरम्यान भाग्यश्री आत्राम यांचे आगमन होताच विद्यार्थी आणि शिक्षकांनी जल्लोषात स्वागत केले.कोपरअली, मथुरानगर, विजयनगर, लक्ष्मीपूर, लगाम, विवेकानंदपूर आणि शांतीग्राम आदी शाळेतील विद्यार्थ्यांनी झांकी द्वारे सर्वांनाच मंत्रमुग्ध केले.दोन दिवस चालणाऱ्या तालुका स्तरीय बाल कला व क्रीडा स्पर्धेत स्पर्धेत गांधीनगर, लगाम, सुंदरनगर आणि मुलचेरा चार केंद्रातील जवळपास ३०० विद्यार्थी आपले क्रीडा कौशल्य दाखविणार आहेत.



# बोंड (राजोली) येथे श्री गुरु गोविंदसिंह यांची ३५७ वी जयंती साजरी



**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यातील बोंड येथील सिख समाजातर्फे शिखांचे शेवटचे आणि दहावे गुरु श्री गुरुगोविंद सिंग यांची ३५७ वी जयंती रविवारी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.दरम्यान श्री गुरुगोविंद सिंग यांच्या जयंतीच्या औचित्याने 'गुरु ग्रंथ साहिब' या धार्मिक ग्रंथाचे पारायण करण्यात आले. यावेळी भजन व संगीतमय कार्यक्रम पार पडले.यावेळी अमरावतीहुन आलेल्या मान्यवरांचे सत्कार करण्यात आले.यावेळी कार्यक्रमाचे मुख्य आयोजक दयालसिंग जुनी, तिरथसिंग जुनी,दर्शनसिंग जुनी,हरभजन सिंग जुनी,भगवान सिंग जुनी,सतनाम सिंग जुनी,तथा परिसरातील जनकापूर,पळसगाव खुर्द, बाळापूर,गांगलवाडी,मेंडकी येथील शिख समाज बांधव उपस्थित होते.या कार्यक्रमाला गावातील ग्रामस्थांनी मोठी उपस्थिती होती.शेवटी मिठा प्रसादाचे वाटप करण्यात आले. व सायंकाळी संपूर्ण गावाला महाप्रसादाच्या रूपात भोजन दान करण्यात आले.

# सरपंच संघटनेच्या अध्यक्षपदी राहुल मुरकुटे

**मुल । प्रतिनिधी**

मुल तालुक्यातील ग्राम पंचायत सरपंच संघटना अतिशय पावरफुल असून तालुक्यातील सरपंच यांच्या मागण्या व ग्राम पंचायतचा व गावाचा विकास यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांची चर्चा करून विकास करण्यासाठी प्रयत्न करण्याचे काम करीत असते. त्याच मुल तालुका ग्राम पंचायत संघटनेची दिनांक १ फेब्रुवारी रोज गुरवारला पं. स.मुल येथील सभागृहात सरपंच संघटना मुल तालुका स्तरीय नवीन कार्यकारणी गठित करण्यासाठी सभा आयोजित केलेली होती.सदर सभेला मुल तालुक्यातील समस्त सरपंच यांनी भाग घेतला.यात सरपंच संघटना मुल तालुका अध्यक्ष पदी राहुल गजानन मुरकुटे सरपंच ग्रामपंचायत ताडाळा तथा कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक यांची निवड करण्यात आली.तसेच उपाध्यक्ष जुनासुर्ला येथील सरपंच रंजित समर्थ, सचिव म्हणून मुरलीधर चुधरी, तर सहसचिव म्हणून उसराला महिला सरपंच प्रियांका नर्मलवार,कोषाध्यक्ष कोमल रणदये, संघटक पदी सुशी येथील



सरपंच अनिल सोनुले ,कायदेशीर सल्लागार म्हणून नांदगाव सरपंच. ड . हिमानी वाकुडकर ,तसेच सदस्य म्हणून वासुदेव वाघ,चांगदेव केमेकर,शिल्पा भोयर, वैशाली निकोडे,जस्मिता लेनगुरे,यशवंत खोब्रागडे अशा प्रकारे कार्यकारणीची निवड करून नवीन कार्यकारिणी गठित करण्यात आली.सरपंच संघटना निवड करण्यासाठी सर्व प्रक्रिया पार पाडण्यासाठी ग्रामविस्तार अधिकारी विजय यारेवार , येरमे ग्रामविस्तार अधिकारी आकुलवार , साहरे , गजभे वरील सर्व अधिकारी उपस्थितीत राहून सहकार्य केले.नव निर्वाचित सरपंच संघटनेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव,सहसचिव, व कार्यकारिणीच्या समस्त सदस्यांचे तालुक्यातील सर्व सरपंच,उपसरपंच सदस्य यांनी अभिनंदन केले आहे.

# दुर्गाली बारसागडे या विद्यार्थिनीचा सत्कार



**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

नागभीड तालुका पत्रकार संघातर्फे मंगळवारी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये सावरगाव येथील गुणवंत विद्यार्थिनी दुर्गाली राजेश बारसागडे या ११ विच्या विद्यार्थिनींचा शिल्ड,प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.तीने दहावीच्या परीक्षेत उत्तम गुण प्राप्त केले होते. याबद्दल मान्यवरांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला.

यावेळी प्रा.कृष्णा राऊत, ट्विंकल इंग्लिश स्कूलच्या प्राचार्य शुभांगी पोहेकर,माजी जि.प.सदस्य संजय गजपुरे,नागभीड तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष एडवोकेट श्याम पाथोडे,जेष्ट पत्रकार पंढरीनाथ बांडे,पत्रकार राजेश झाल्लरवार,तळोधी पत्रकार संघाचे अध्यक्ष राजेश बारसागडे,जेष्ट पत्रकार गरफडे,तालुका सचिव अरुण भोले,संपादक आर.डी.रामटेके अशोक कोसे आदींची उपस्थिती होती.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .